# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 06/08/2021 (शुक्रवार)
(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. सावनेर :— अंतर्गत 4 कि. मी. अंतरावरील सावनेर ते नागपुर रोड एनएच— 47 माळेगाव येथे दिनांक 04/08/2021 चे 22:45 वा. दरम्यान एम.एच—49/बी— 5338 क्रमांकाचा इंडीगो कारचा चालक आरोपी/मृतक नामे— रवि छत्रलाल उईके, वय 28 वर्षे, रा.डब्लुसीएल वाघोडा सावनेर हा आपले कारमध्ये 1) विक्की प्रसादी राकेश वय 27 वर्षे, रा. गुजरखेडी सावनेर, 2) प्रफुल ज्ञानेश्वर मोरे, वय 28 वर्षे, रा. हुडकेश्वर पिपळा फाटा नागपुर व 3) राहुल जर्नाधन शेडामे, वय 28 वर्षे, रा. महात्मा फुले नगर, सावनेर यांना कारमध्ये बसवुन सावनेर वरून पाटनसावंगी येथे जेवण करन्याकरीता जात असतांना आरोपी याने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन नॅशनल हायवेच्या दिशादर्शक लोखंडी ॲगलला धडक मारून दिली. या अपघातात कार पलटी झाल्याने आरोपी हा स्वतःच्या मरन्यास कारणीभुत ठरला. तर कारमध्ये बसलेल्या वरील तिन्ही इसमांचे जखमी होन्यास मृतक/आरेपी कारणीभुत असल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— विक्की प्रसादी राकेश, वय 27 वर्षे, रा. गुजरखेडी वार्ड क्र. 3, सावनेर ता.सावनेर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री मांढरे 8275284745 हे करीत आहे.

### अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीला अटक

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत 2 कि. मी. अंतरावरील बोर्डा फोर लाईन नागपूर ते जबलपुर कडे जानारा रोड कन्हान येथे दिनांक 05/08/2021 चे 18.30 वा. ते 19.15 वा. दरम्यान पो.स्टे कन्हान येथील पोलिस स्टाप हे पो.स्टे परिसरात पेट्रोलिंग करित असतांना त्यांना मुखबिराव्दारे मिळालेल्या माहिती वरून बोर्डा फोर लाईन नागपुर ते जबलपुर कडे जानारा रोड कन्हान येथे गेले असता आरोपी नामे— विकास रामेश्वरप्रसाद गोस्वामी, वय 28 वर्षे, रा. वार्ड क्र. 2, कांद्री कन्हान हा स्वतः जवळ कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने विनापरवाना अवैधरीत्या हातात एक लोखंडी शस्त्र कोयतासारखा शस्त्र घेवुन फिरतांना मिळुन आल्याने त्याचे कडुन हत्यार जप्त करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई वैभव बोरपल्ले, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री महादेव सुरजुसे 7666640218 हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर